# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-४०१ १०१, दुरध्वनी क्र : २८१९२८२८

## ॥ लेखा परीक्षण विभाग ॥

जा.क्र.मनपा/मुलेप/५३ /२०१८-१९

दि.१८/०६/२०१८

श्री. प्रविण परमार
साई कम्युनिकेशन
शिवाजी महाराज पुतळा जवळ
चिंचोळी बंदर रोड
मालाड (प)

विषय:- केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम २००५
लेखापरीक्षण विभागाकडील जानेवारी २०१७ ते ३१ मार्च २०१८ पर्यंतच्या रजिस्टरच्या छायांकित प्रती व अद्यावत ठेवण्यात आलेल्या रजिस्टरची माहितीची मागणी.

संदर्भ:-
१) आपला दि.०२/०४/२०१८ चा माहिती अधिकारातील अर्ज.
२) जा.क्र.मनपा/मुलेप/१३/२०१८-१९ दि.२५/०४/२०१८ चे पत्र.
३) आपले दि.२२/०५/२०१८ रोजीचे अपिल अर्ज प्राप्त दि. २४/०५/२०१८
४) जा.क्र.मुलेप/१२/२०१८-१९ दि.१२/०६/२०१८ रोजीचे सुनावणी पत्र.
५) जा.क्र.मनपा/मुलेप/५२/२०१८-१९ दि.१२/०६/२०१८ चा सुनावणी निर्णय

महोदय,

उपरोक्त विषयासंबंधी कळविण्यात येत आहे कि, आपण लेखापरीक्षण विभागाकडील जानेवारी २०१७ ते ३१ मार्च २०१८ पर्यंतच्या रजिस्टरच्या छायांकित प्रती व अद्यावत ठेवण्यात आलेल्या रजिस्टरची माहितीची मागणी केली होती. त्यानुसार संदर्भ क्र.०५ अन्वये दिलेल्या सुनावणी निर्णयानुसार श्री. प्रविण परमार यांना शासन परिपत्रक क्र.रामाआ२०१६/प्र.क्र.(१७८/१६) सहा.मंत्रालय मुंबई. दि.०१/०२/२०१७ मधील अधिनियमातील तरतुदीनुसार पृष्ठ क्र.१ ते ५० करिता निरंक व पृष्ठ क्र. ५१ ते २०२० करिता प्रती प्रत रु. २/- प्रमाणे एकुण १९७० प्रतींची रक्कम रु.३९४०/- शुल्क लेखापरीक्षण विभागाकडे भरणा केल्यानंतर आपणास सदरील माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

Issued on 05.7.18

माहिती अधिकारी तथा
सहा.लेखापरीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

Google

in:sent

1 of 54

Gmail

Move to Inbox

More

COMPOSE

Inbox (228)
Starred
Important
Sent Mail
Drafts (14)
Categories
More

mbmc

# (no subject)

**mbmc Audit dept** <mbmcaudit@gmail.com> 6:25 PM (3 minutes ago)

to Pravin

plz find the attachment



Click here to Reply or Forward

No recent chats
Start a new one

0.88 GB (5%) of 15 GB used
Manage

Terms · Privacy · Program Policies

Last account activity: 1 day ago
Details

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र.माअधि/अपिल/०२ /२०१८-१९
लेखा परीक्षण विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प)
ता.जि.ठाणे-४०१ १०१, दुरध्वनी क्र : २८१९२८२८
Email.Id:- mbmcaudit@gmail.com
जा.क्र.मनपा/मुलेप/५२ /२०१७-१८ दि.१२/०६/२०१८

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्यलेखापरीक्षक मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री. प्रविण परमार
साई कम्युनिकेशन
शिवाजी महाराज पुतळा जवळ
चिंचोळी बंदर रोड
मालाड (प)

......अपिलार्थी

विरुध्द

जनमाहिती अधिकारी तथा
सहा.लेखापरीक्षक, लेखापरीक्षण विभाग

......प्रतिवादी

## :- विवेचन :-

अपिलार्थी श्री. प्रविण परमार पत्ता साई कम्युनिकेशन, शिवाजी महाराज पुतळा जवळ, चिंचोळी बंदर रोड, मालाड (प) यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार लेखापरीक्षण विभागाकडील जानेवारी २०१७ ते ३१ मार्च २०१८ पर्यंतच्या रजिस्टरच्या छायांकित प्रती व अद्यावत ठेवण्यात आलेल्या रजिस्टरची माहितीची मागणी केली होती. त्यानुसार श्री.प्रविण परमार यांनी दि.२२/०५/२०१८ रोजी प्रथम अपिल अधिकारी यांच्याकडे अपिल दाखल केले. सदर अपिलाची सुनावणी दि.१२/०६/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता ठेवण्यात आली होती.

**अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा तपशिल:-**

लेखापरीक्षण विभागाकडील जानेवारी २०१७ ते ३१ मार्च २०१८ पर्यंतच्या रजिस्टरच्या छायांकित प्रती व अद्यावत ठेवण्यात आलेल्या रजिस्टरची माहिती इ.

**अपिल दाखल करण्याचे कारण:-**

माहिती अधिकारात मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रतीची रक्कम जास्त असुन ही शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे दिलेली नसल्याने अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा सहा. लेखापरीक्षक, लेखापरीक्षण विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१२/०६/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता उपस्थित राहण्याबाबत दि.२८/०५/२०१८ रोजी पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर सुनावणीस खालीलप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा अपिलार्थी उपस्थित होते.

१) श्री. प्रविण परमार (अपिलार्थी)

२) जनमाहिती अधिकारी तथा सहा. लेखापरीक्षक

**जनमाहिती अधिकारी व अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद:-**

लेखापरीक्षण विभागाकडील जानेवारी २०१७ ते ३१ मार्च २०१८ पर्यंतच्या रजिस्टरच्या छायांकित प्रती व अद्यावत ठेवण्यात आलेल्या रजिस्टरची एकुण २०२० इतकी पृष्ठे होत असुन प्रती पृष्ठ रुपये २ प्रमाणे एकुण रक्कम रु.४०४०/- इतकी भरणा करणे बाबत अपिलार्थी यांना दि.२५/०४/२०१८ रोजी स्पीड पोस्टाव्दारे कळविण्यात आलेले होते. अपिलार्थी यांनी रक्कम न भरता अपिल दाखल केले. याबाबत अपिलार्थी यांनी माहिती अधिकारात मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रतीची रक्कम जास्त असुन ही शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे दिलेली नसल्याबाबत युक्तीवाद केला.

**वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.**

**-:निर्णय:-**

अपिलार्थी यांनी अपेक्षिलेली माहिती त्यांना अदयाप पर्यंत मिळालेली नाही. तथापि माहिती अधिकारी यांनी शासन परिपत्रक क्र.रामाआ२०१६/प्र.क्र.(१७८/१६) सहा.मंत्रालय मुंबई. दि.०१/०२/२०१७ मधील अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती छायांकित सत्यप्रती करीता शासन निर्णयाप्रमाणे शुल्क आकारणी करुन घेवुन माहिती तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावी.

O/C

12.06.18

**(दिग्विजय चव्हाण)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**मुख्यलेखापरीक्षक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

issued on 05.07.18
Pravin

**प्रति**

**१) श्री. प्रविण परमार**
**साई कम्युनिकेशन,**
**शिवाजी महाराज पुतळा जवळ**
**चिंचोळी बंदर रोड**
**मालाड (प)**

**२) जनमाहिती अधिकारी तथा**
**सहा. लेखापरीक्षक, लेखापरीक्षण विभाग**